# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १९/०६/२०२४ (बुधवार)**

---

**अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक**
**वाहनासह एकुण २०,४०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त**

दिनांक १७/०६/२०२४ रोजी २३.१० वा. ते २३.३० वा. दरम्यान पोस्टे भिवापूर येथील स्टाफ पो. स्टे. हद्दीत अवैध रेती (गौणखनिज) वाहतूकीस आळा घालणेकरिता पेट्रोलिंग करीत असताना एक पांढऱ्या निळया रंगाचे टिप्पर भिवापूरकडुन भिसीकडुन पांझरेपार फाटाकडे टिप्पर क्र. MH-36/AA-9833 हा येताना दिसला. मौजा नांद ग्राम येथे नाकाबंदी दरम्यान टिप्परला थांबवून पाहणी केली असता टिप्पर क्र. MH-36/AA-9833 मध्ये अंदाजे ०८ ब्रास रेती (गौणखनिज) मिळून आल्याने सदर टिप्पर चालकास टिप्पर मधील रेतीचे (गौणखनिज) रॉयल्टी बाबत विचारले असता त्यांनी रॉयल्टी नसल्याचे सांगून टिप्पर मालकाचे सांगण्यावरून रेती (गौणखनिज) गुडेगाव घाटातून आणल्याचे सांगितले. सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीच्या ताब्यातून टिप्पर क्र. MH-36/AA-9833 किंमती २०,००,०००/—रू. व त्यामधील ०८ ब्रास रेती किंमती रु. ४०,०००/— तसेच असा एकूण रु. २०,४०,०००/— चा मुद्देमाल जप्त करून टिप्पर चालक नामे १) अविनाश मारोती चंडीमेश्राम, वय २७ वर्ष, रा. जुनोना ता. पवनी जि. भंडारा २) मालक नामे धनपाल गभने रा. गुडेगाव ता. पवनी जि भंडारा ३) अनोळखी यांचे विरुद्ध पोस्टे भिवापूर येथे कलम ३७९, १०९, ३४ भा. द. वी. सहकलम ४८(७), ४८(८) महा. ज. म. स. सहकलम ४, २१ खाणी आणि खनिजे अधी. १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे भिवापूर येथील ठाणेदार सपोनि जयप्रकाश निर्मल, पोहवा किशोरसिंग ठाकुर, पोशि प्रितम खोपे, होमगार्ड सैनिक कमलेश माहुरे, प्रकाश नागपुरे यांनी केलेली आहे.

## अवैधरीत्या घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूद्ध

## —: पोस्टे कुही, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

दिनांक १८/०६/२०२४ रोजी पोस्टे कुही येथील स्टाफ पोस्टे परीसरात पेट्रोलींग करीत असता मुखबिरद्वारे खबर मिळाली की, मौजा साळवा येथे आरोपी वाल्या उर्फ ईश्वर मधुकर कांढाळकर, वय ३२ वर्ष रा. साळवा हा गावात तलवार घेवुन घुमत आहे. अशा माहीती वरून फिर्यादी हे स्टाफसह साळवा गावात पोहचले असता आरोपी हा हातात तलवार घेवुन घुमत होता. त्याच्या कडुन कोणताही अनुचित प्रकार घडु नये म्हणुन त्याच्या हातातील तलवार ताब्यात घेवुन सदर आरोपी इसमाविरुद्ध पो.स्टे. कुही अप. क्र. ३०५/२४ कलम ४, २५ भारतीय शस्त्र अधि., सहकलम १३५ मपोका. अन्वये गुन्हा नोंद केला.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कुही येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक भानुदास पिदुरकर, पोहवा चांगदेव कुथे, आशिष खंडाईत यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर